जनसंपर्क कक्ष
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 DEC 2025

# लोकशाही बळकटीसाठी जागृत व्हा

## जिल्हाधिकारी अमोल येडगे : विद्यापीठातील राष्ट्रीय चर्चासत्र

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ९ : 'व्यक्ती, समाज, देशाच्या सर्वांगीण समृद्धीचा मार्ग भारतीय संविधानातूनच जातो. संविधानातील स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय ही मूल्ये प्रत्येक व्यक्तीला सन्मानपूर्वक जीवन जगण्यासाठी आधार देतात. लोकशाही बळकट होण्यासाठी जागृत नागरिक होणे गरजेचे आहे', असे प्रतिपादन जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, गांधी अभ्यास केंद्र आणि समाजकल्याण विभाग कोल्हापूरतर्फे पीएम-उषा योजनेअंतर्गत होणाऱ्या 'भारतीय राज्यघटना : मूलभूत संरचना सिद्धांताचा विकास' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव होत्या, तर निवृत्त सनदी अधिकारी लक्ष्मीकांत देशमुख, समाजकल्याण सहायक आयुक्त सचिन साळे प्रमुख उपस्थित होते.

जिल्हाधिकारी येडगे म्हणाले, 'भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात जात, धर्म, वंश, पंथ यातील भिन्नता असूनही एकात्मता जपण्याचे कार्य संविधान करते. असे सक्षम, सर्वसमावेशक आणि मूल्यआधारित संविधान जगात दुर्मीळ आहे. सरनाम्यातील प्रत्येक शब्द हा सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनाशी जोडलेला आहे.'

उद्घाटनानंतरच्या सत्रात देशमुख यांनी संविधानाच्या मूलभूत संरचनेच्या अनुषंगाने मार्गदर्शन केले. गांधी अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रकाश पवार यांनी स्वागत केले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. एस. एच. पाटील, डॉ. श्रीराम पवार, उपकुलसचिव डॉ. नीलेश बनसोडे, विलास सोयम, उत्तम सकट, विनय शिंदे उपस्थित होते. डॉ. नगिना माळी, प्रियांका सुर्वे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. कृष्णा पाटील यांनी आभार मानले.



**कोल्हापूर :** चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना जिल्हाधिकारी अमोल येडगे. यावेळी शेजारी डावीकडून डॉ. प्रकाश पवार, सचिन साळे, ज्योती जाधव, लक्ष्मीकांत देशमुख, व्ही. एन. शिंदे, कृष्णा पाटील उपस्थित होते.

### राष्ट्रजीवनाला स्थैर्य, दिशा...

**प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. जाधव म्हणाल्या, 'नागरिक म्हणून आपण हक्कांची मागणी करत असताना कर्तव्यांची जाणीवही अंगी बाणवली पाहिजे. भारतीय राज्यघटना हा एक जिवंत दस्तऐवज आहे. तिच्या मूलभूत तत्त्वांमध्येच राष्ट्रजीवनाला स्थैर्य, दिशा आणि मूल्याधिष्ठान मिळते.'**

10 DEC 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्वराज्याच्या सार्वभौमत्वासाठीच महाराणी ताराबाईंचा लढा

## डॉ. जयसिंगराव पवार : शिवाजी विद्यापीठात दोन दिवसीय चर्चासत्राला सुरुवात

प्रतिनिधी
कोल्हापूर

**छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वतंत्र स्वराज्याला सार्वभौमत्व प्रदान करण्यासाठी महाराणी ताराबाई यांनी मोठा तात्त्विक लढा उभारला. इतिहासकार आणि अभ्यासकांनी त्यांच्या विविध पैलूंचा अभ्यास करावा, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहासकार डॉ. जयसिंगराव पवार यांनी केले.**

महाराणी ताराबाई यांच्या ३५० व्या जयंतीचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठात 'महाराणी ताराबाई आणि अठरावे शतक: एक ऐतिहासिक दृष्टिक्षेप" या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख होते. विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग, शाहू संशोधन केंद्र, छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र आणि छत्रपती संभाजी महाराज संशोधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने चर्चासत्र होत आहे.



कोल्हापूर : छत्रपती महाराणी ताराबाई यांच्या जन्मशताब्दीनिमित्ताने आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात बोलताना डॉ. जयसिंगराव पवार. सोबत डॉ. अवनीश पाटील, डॉ. महादेव देशमुख आणि डॉ. नीलांबरी जगताप.

डॉ. पवार म्हणाले, महाराणी ताराबाई या कर्तबगार आणि पराक्रमी होत्या. तरीही गेल्या सव्वाशे वर्षांत मराठा इतिहासाविषयी जो अभ्यास झाला, त्यामध्ये त्यांची खूपच उपेक्षा झाली. या कालखंडात अनेकांनी शिवचरित्रे लिहिली, पेशव्यांचे चरित्र लिहिले, तथापि, ताराबाईविषयी लिहावेसे कोणालाही वाटले नाही. किंबहुना, छत्रपती शिवाजी महाराजांपासून पेशवाईच्या उदयापर्यंतचा कालखंड याबाबतीत उपेक्षित राहिला.

इतिहासकारांनी संभाजी महाराजांना बदफैली आणि राजाराम महाराजांना दुबळा ठरविले व थेट बाळाजी विश्वनाथाच्या चरित्राला हात घातला. गुरूवर्य वा. सी. बेंद्रे यांनी मात्र, छत्रपती संभाजी महाराज यांच्याविषयी सुमारे ४० वर्षे संशोधन करून त्यांची उज्ज्वल प्रतिमा जगासमोर आणली. छत्रपती राजाराम महाराज व छत्रपती ताराबाई यांच्याविषयीचे संशोधन माझ्या हातून व्हावे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू तथा ज्येष्ठ इतिहासकार डॉ. आप्पासाहेब पवार यांनी ताराबाईविषयीची कागदपत्रे वेगवेगळ्या देशीविदेशी दप्तरांमधून अथक परिश्रमाने आयुष्यभर जमा केली. त्यामधून ताराबाईंचा वस्तुनिष्ठ इतिहास जगासमोर आणता आला. नव्या संशोधकांनी अद्यापही अज्ञात असणारे त्यांचे पैलू समोर आणण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता डॉ. पवार यांनी व्यक्त केली.

### ताराबाई हिम्मतबाज, बुद्धिमान आणि रणनीतीज्ञ

ताराबाई या अत्यंत हिम्मतबाज, बुद्धिमान आणि शहाण्या रणनीतीज्ञ होत्या. सैन्याचे संयोजन त्या अत्यंत कुशल पद्धतीने करीत असत, असे गौरवोद्गार परदेशी इतिहासकारांनी केले आहे. फिलीप सार्जंट याने तर जगातील आघाडीच्या दहा प्रभावी महिलांमध्ये त्यांची गणना केली आहे. नवा मुलूख काबीज करणे, किल्ले लढवत ठेवणे आणि संधी मिळताच बादशहाला नामोहरम करणे अशी यशस्वी नीती त्यांनी अवलंबली होती. मराठी अधिविभागाचे डॉ. नंदकुमार मोरे यांनी डॉ. पवार यांची महाराणी ताराबाई यांच्याविषयी घेतलेल्या मुलाखतीत विविध पैलू उघड केले.

अधिष्ठाता डॉ. देशमुख म्हणाले, महाराणी ताराबाई यांनी एकाच वेळी मोगलांसारखा शत्रू, स्वकीय व पेशवे असा त्रिस्तरीय संघर्ष केला. त्याची अधिक चिकित्सक अंगाने मांडणी व्हावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

सुरवातीला मान्यवरांच्या हस्ते महाराणी ताराबाई यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले. इतिहास अधिविभागाचे प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. नीलांबरी जगताप यांनी आभार मानले.

यावेळी डॉ. भारती पाटील, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. अरुण शिंदे, सुरेश शिपूरकर, बाळ पाटणकर, डॉ. भारतभूषण माळी, डॉ. विजय चोरमारे, मराठा महासंघाचे वसंतराव मुळीक, इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत, महाराष्ट्र केसरी विष्णू जोशीलकर, डॉ. सुरेश शिखरे, डॉ. दत्ता मचाले, डॉ. उमाकांत हतीकट आदी उपस्थित होते.

10 DEC 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्वराज्याच्या सार्वभौमत्वासाठीच ताराबाईंचा लढा

## डॉ. जयसिंगराव पवार; विद्यापीठात दोन दिवसीय चर्चासत्रास प्रारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वतंत्र स्वराज्याला सार्वभौमत्व प्रदान करण्यासाठी महाराणी ताराबाई यांनी मोठा तात्त्विक लढा उभारला. इतिहासकार व अभ्यासकांनी त्यांच्या विविध पैलूंचा साक्षेपी अभ्यास करावा, असे आवाहन ज्येष्ठ इतिहासकार डॉ. जयसिंगराव पवार यांनी केले.

महाराणी ताराबाई यांच्या ३५० व्या जयंतीचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठात मंगळवारपासून 'महाराणी ताराबाई आणि अठरावे शतक : एक ऐतिहासिक दृष्टिक्षेप' विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राला प्रारंभ झाला. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठता डॉ. महादेव देशमुख होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात छत्रपती महाराणी ताराबाई यांच्या ३५० व्या जन्मशताब्दीनिमित्ताने आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात सूत्रभाष्य करताना डॉ. जयसिंगराव पवार. समवेत डॉ. अवनीश पाटील, डॉ. महादेव देशमुख आणि डॉ. नीलांबरी जगताप.**

**(छाया : मिलन मकानदार)**

डॉ. पवार म्हणाले, महाराणी ताराबाई कर्तबगार, पराक्रमी होत्या. तरीही गेल्या सव्वाशे वर्षांत मराठा इतिहासाविषयी जो अभ्यास झाला, त्यामध्ये त्यांची खूपच उपेक्षा झाली. या कालखंडात अनेकांनी शिवचरित्रे लिहिली, पेशव्यांचे चरित्र लिहिले, तथापि, ताराबाईंविषयी लिहावेसे कोणालाही वाटले नाही. गुरूवर्य वा. सी. बेंद्रे यांनी मात्र छत्रपती संभाजी महाराज यांच्याविषयी सुमारे ४० वर्षे संशोधन करून त्यांची प्रतिमा जगासमोर आणली.

इतिहास अधिविभागाचे प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नीलांबरी जगताप यांनी आभार मानले.

यावेळी डॉ. भारती पाटील, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. अरुण शिंदे, सुरेश शिपूरकर, बाळ पाटणकर, डॉ. भारतभूषण माळी, मराठा महासंघाचे वसंतराव मुळीक, इतिहास संशोधक इंद्रजित सावंत उपस्थित होते.

दरम्यान, मराठी अधिविभागाचे डॉ. नंदकुमार मोरे यांनी डॉ. जयसिंगराव पवार यांची महाराणी ताराबाई यांच्याविषयी मुलाखत घेतली. ते म्हणाले, ताराबाई हिम्मतबाज, बुद्धिमान व शहाण्या रणनीतीज्ञ होत्या. सैन्याचे संयोजन कुशल पद्धतीने करीत असत, असे गौरवाद्गार परदेशी इतिहासकारांनी केले आहे. मराठा स्वराज्याचा विस्तार मोठ्या कौशल्याने करून त्यांनी त्याचे साम्राज्यात रूपांतर केले. मराठे पराक्रमी होते, मात्र छत्रपतींना विसरले होते म्हणून अटकेपार झेंडे रोवूनही पानिपतापर्यंत घसरले.

1 0 DEC 2025

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्वराज्याला सार्वभौमत्वासाठी ताराबाईंचा लढा

## ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार :महाराणी ताराबाई यांच्या जयंतीनिमित्त चर्चासत्र

**जनप्रवास : कोल्हापूर**

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वतंत्र स्वराज्याला सार्वभौमत्व प्रदान करण्यासाठी महाराणी ताराबाई यांनी मोठा तात्त्विक लढा उभारला. इतिहासकार आणि अभ्यासकांनी त्यांच्या विविध पैलूंचा साक्षेपी अभ्यास करावा, असे आवाहन ज्येष्ठ इतिहासकार डॉ. जयसिंगराव पवार यांनी केले.

महाराणी ताराबाई यांच्या ३५० व्या जयंतीचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठातील "महाराणी ताराबाई आणि अठरावे शतकः एक ऐतिहासिक दृष्टिक्षेप" या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राला प्रारंभ झाला. उद्घाटन सत्रात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख होते. विद्यापीठातील इतिहास अधिविभाग, शाहू संशोधन केंद्र, छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र आणि छत्रपती संभाजी महाराज संशोधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने चर्चासत्राचे आयोजन केले आहे.




**शिवाजी विद्यापीठातील आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ. जयसिंगराव पवार. सोबत डॉ. अवनीश पाटील, डॉ. महादेव देशमुख, डॉ. नीलांबरी जगताप.**

डॉ. पवार म्हणाले, महाराणी ताराबाई या कर्तबगार आणि पराक्रमी होत्या. तरीही गेल्या सव्वाशे वर्षांत मराठा इतिहासाविषयी जो अभ्यास झाला, त्यामध्ये त्यांची खूपच उपेक्षा झाली. ताराबाईंविषयी लिहावेसे कोणालाही वाटले नाही. किंबहुना, छत्रपती शिवाजी महाराजांपासून पेशवाईच्या उदयापर्यंतचा कालखंड याबाबतीत उपेक्षित राहिला. गुरूवर्य वा.सी. बेंद्रे यांनी मात्र छत्रपती संभाजी महाराज यांच्याविषयी सुमारे ४० वर्षे संशोधन करून त्यांची उज्ज्वल प्रतिमा जगासमोर आणली. शिवाजी विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांनी ताराबाईंविषयीची कागदपत्रे वेगवेगळ्या देशीविदेशी दप्तरांमधून अथक परिश्रमाने आयुष्यभर जमा केली. या कागदपत्रांचे विश्लेषण, अभ्यास आणि संशोधन करण्याची संधी त्यांनी दिली. त्यामधून ताराबाईंचा वस्तुनिष्ठ इतिहास जगासमोर आणता आला आणि उपेक्षेच्या छायेतून त्यांना बाहेर काढता आले.

अध्यक्षस्थानावरून अधिष्ठाता डॉ. देशमुख म्हणाले, भारतातील मराठेशाहीच्या जडणघडणीविषयी साद्यंत चर्चा व्हावी. विशेषतः महाराणी ताराबाई यांनी एकाच वेळी मोगलांसारखा शत्रू, स्वकीय आणि पेशवे असा त्रिस्तरीय संघर्ष केला. त्याविषयी अधिक चिकित्सक अंगाने मांडणी व्हावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

इतिहास अधिविभागाचे प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नीलांबरी जगताप यांनी आभार मानले. यावेळी डॉ. भारती पाटील, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. अरुण शिंदे, सुरेश शिपूरकर, बाळ पाटणकर, डॉ. भारतभूषण माळी, डॉ. विजय चोरमारे, मराठा महासंघाचे वसंतराव मुळीक, डॉ. इंद्रजीत सावंत, महाराष्ट्र केसरी विष्णू जोशीलकर, डॉ. सुरेश शिखरे, डॉ. दत्ता मचाले, डॉ. उमाकांत हत्तीकट आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
10 DEC 2025
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्वराज्याला सार्वभौमत्व प्रदान करण्यासाठी ताराबाईंचा लढा

## डॉ. जयसिंगराव पवार; चर्चासत्राला प्रारंभ



**कोल्हापूर :** महाराणी ताराबाई यांच्या ३५० व्या जन्मशताब्दीनिमित्त आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात बोलताना ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार. यावेळी उपस्थित डावीकडून डॉ. अवनीश पाटील, महादेव देशमुख, नीलांबरी जगताप.

कोल्हापूर, ता. ९ : 'छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वतंत्र स्वराज्याला सार्वभौमत्व प्रदान करण्यासाठी महाराणी ताराबाई यांनी मोठा तात्त्विक लढा उभारला. इतिहासकार आणि अभ्यासकांनी त्यांच्या विविध पैलूंचा साक्षेपी अभ्यास करावा', असे आवाहन ज्येष्ठ इतिहासकार आणि संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी आज येथे केले.

महाराणी ताराबाई यांच्या ३५० व्या जयंतीनिमित्त विद्यापीठात आयोजित 'महाराणी ताराबाई आणि अठरावे शतक : एक ऐतिहासिक दृष्टिक्षेप' या विषयावरील दोनदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख होते. विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग, शाहू संशोधन केंद्र, छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र, छत्रपती संभाजी महाराज संशोधन केंद्रातर्फे चर्चासत्र होत आहे.

डॉ. पवार म्हणाले, 'महाराणी ताराबाई या कर्तबगार आणि पराक्रमी होत्या. तरीही गेल्या सव्वाशे वर्षांत मराठा इतिहासाविषयी जो अभ्यास झाला, त्यामध्ये त्यांची खूपच उपेक्षा झाली. या कालखंडात अनेकांनी शिवचरित्रे लिहिली, पेशव्यांचे चरित्र लिहिले. तथापि, ताराबाईंविषयी लिहावेसे कोणालाही वाटले नाही. गुरुवर्य वा. सी. बेंद्रे यांनी मात्र छत्रपती संभाजी महाराज यांच्याविषयी सुमारे ४० वर्षे संशोधन करून त्यांची उज्ज्वल प्रतिमा जगासमोर आणली. छत्रपती राजाराम महाराज आणि छत्रपती ताराबाई यांच्याविषयीचे संशोधन माझ्या हातून व्हावे, हा नियतीचा संकेत असावा.'

डॉ. देशमुख म्हणाले, 'महाराणी ताराबाई यांनी एकाच वेळी मोगलांसारखा शत्रू, स्वकीय आणि पेशवे असा त्रिस्तरीय संघर्ष केला.' इतिहास अधिविभागाचे प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नीलांबरी जगताप यांनी आभार मानले.

### हिम्मतबाज, बुद्धिमान रणनीतीज्ञ

मराठी अधिविभागाच्या डॉ. नंदकुमार मोरे यांनी डॉ. जयसिंगराव पवार यांची महाराणी ताराबाई यांच्याविषयी घेतलेली मुलाखत तासभराहून अधिक काळ रंगली. डॉ. पवार म्हणाले, 'ताराबाई या अत्यंत हिंमतबाज, बुद्धिमान रणनीतीज्ञ होत्या. फिलीप सार्जंट याने तर जगातील आघाडीच्या दहा प्रभावी महिलांमध्ये त्यांची गणना केली आहे. ताराबाईंनी एक प्रकारे मोगलांविरुद्ध स्वातंत्र्ययुद्धच छेडले होते. मराठा स्वराज्याचा विस्तार मोठ्या कौशल्याने करून त्यांनी त्याचे साम्राज्यात रूपांतर केले.' 'मराठे पराक्रमी होते. मात्र, छत्रपतींना विसरले होते म्हणून अटकेपार झेंडे रोवूनही पानिपतापर्यंत घसरले', असेही त्यांनी सांगितले.

10 DEC 2025
सकाळ

# विद्यापीठात आजपासून भौतिकशास्त्राची आंतरराष्ट्रीय परिषद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधिविभागातर्फे पाचवी आंतरराष्ट्रीय परिषद बुधवार(ता.१०) ते शुक्रवार (ता. १२) दरम्यान होणार आहे. 'फिजिक्स ऑफ मटेरियल्स अँड मटेरियल्स बेस्ड डिव्हाईस फॅब्रिकेशन (आयसीपीएम-एमडीएफ २०२५)' असा या परिषदेचा विषय असल्याची माहिती परिषदेचे अध्यक्ष आणि विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. राजेंद्र सोनकवडे यांनी दिली. या परिषदेत जपान, दक्षिण कोरिया, जर्मनी, स्वीडन आणि आयर्लंड आदी देशांतील संशोधक, शास्त्रज्ञ आणि विचारवंत सहभागी होणार आहेत. यामुळे राष्ट्रीयस्तरावरील विद्यार्थी, संशोधक आणि शिक्षकांना आंतरराष्ट्रीय पातळीवरील तज्ज्ञांचे थेट मार्गदर्शन मिळण्याची आणि त्यांच्याशी संवाद साधण्याची संधी उपलब्ध होणार आहे. या ज्ञानाच्या देवाण-घेवाणीतून नवीन संकल्पनांचा उगम होईल आणि त्यातूनच भविष्यातील संशोधनाची नवी दिशा निश्चित केली जाईल. समन्वयक डॉ. एन. एल. तरवाळ, सहसमन्वयक डॉ. व्ही. एस. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली परिषदेची तयारी सुरू असल्याची माहिती डॉ. सोनकवडे दिली.

1 0 DEC 2025
तरुण भारत

# विद्यापीठात भाऊ पाध्ये यांच्या साहित्यावर राष्ट्रीय चर्चासत्र

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

■ **शुक्रवार १२ व १३ रोजी आयोजन**

अग्रगण्य लेखक भाऊ पाध्ये यांच्या जन्मशताब्दीनिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागातर्फे शुकवार दि.१२ रोजीपासून 'भाऊ पाध्ये यांचे वाङ्मयः आकलन आणि पुनर्विचार' विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले असल्याची माहिती अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली.

केंद्र सरकारच्या पीएम-उषा योजनेअंतर्गत विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात चर्चासत्र होणार आहे. १२ रोजी सकाळी ११ वाजता पुण्याचे कवी, अनुवादक व समीक्षक प्रा. चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. ज्येष्ठ लेखक-समीक्षक प्रा. अविनाश सप्रे यांचे बीजभाषण होणार आहे. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे अध्यक्षस्थानी उपस्थित असणार आहेत. मुंबईच्या आरती साळुंखे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

यावेळी 'भाऊ पाध्येः स्तंभलेखन, चित्रपटविषयक आणि अन्य लेखन' या विषयावरील परिसंवाद होणार आहे.

10 DEC 2025
पुढारी

# विद्यापीठात भाऊ पाध्ये यांच्या साहित्याविषयी १२ डिसेंबरपासून चर्चासत्र

**कोल्हापूर :** साठोत्तरी कालखंडातील लेखक भाऊ पाध्ये यांच्या जन्मशताब्दीनिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागातर्फे दि. १२ डिसेंबरपासून 'भाऊ पाध्ये यांचे वाङ्मय: आकलन आणि पुनर्विचार' या विषयावर दोनदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. केंद्र सरकारच्या पीएम-उषा योजनेअंतर्गत विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात चर्चासत्र होणार आहे. दि. १२ रोजी सकाळी ११ वाजता पुण्याचे कवी प्रा. चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते उद्घाटन होईल. ज्येष्ठ लेखक-समीक्षक प्रा. अविनाश सप्रे यांचे बीजभाषण करतील. याप्रसंगी आरती साळुंखे (मुंबई) यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे अध्यक्षस्थानी असतील. कार्यक्रमात गोरख थोरात अनुवादित भाऊ पाध्ये यांच्या 'राडा' या कादंबरीच्या हिंदी भाषांतराचे प्रकाशन होईल. १३ डिसेंबर रोजी भाऊ पाध्ये यांच्या निवडक वाङ्मयाचे ओंकार थोरात अभिवाचन करतील. त्यानंतर 'भाऊ पाध्ये: स्तंभलेखन, चित्रपटविषयक व अन्य लेखन' या विषयावरील परिसंवाद होईल. अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली चर्चासत्राचा समारोप होईल. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.

10 DEC 2025
सकाळ

# भाऊ पाध्येंच्या साहित्याविषयी शुक्रवारी चर्चासत्र

**कोल्हापूर** : साठोत्तरी कालखंडातील अग्रगण्य लेखक भाऊ पाध्ये यांच्या जन्मशताब्दीनिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागातर्फे शुक्रवारी (ता. १२) 'भाऊ पाध्ये यांचे वाङ्मय : आकलन आणि पुनर्विचार' या विषयावर दोनदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र होणार आहे. उद्घाटन शुक्रवारी सकाळी अकरा वाजता कवी प्रा. चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते होईल. ज्येष्ठ लेखक-समीक्षक प्रा. अविनाश सप्रे यांचे बीजभाषण होणार आहे. चर्चासत्रात आसाराम लोमटे, अवधूत डोंगरे, शीतल पावसकर, नितीन रिंढे, दत्ता घोलप, डॉ. माया पंडित-नारकर सहभागी आहेत. शनिवारी (ता. १३) भाऊ पाध्ये यांच्या निवडक वाङ्मयाचे ओंकार थोरात अभिवाचन करतील. त्यानंतर 'भाऊ पाध्ये: स्तंभलेखन, चित्रपटविषयक आणि अन्य लेखन' यावरील परिसंवाद ज्येष्ठ राजकीय विश्लेषक डॉ. श्रीराम पवार यांच्या अध्यक्षतेखाली होईल. यात प्रसाद कुमठेकर, गोरख थोरात, सचिन परब सहभागी होतील, अशी माहिती मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली.

10 DEC 2025

जनप्रवास

# विद्यापीठात स्पार्क फिल्म फेस्टिव्हल

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील बी. ए. फिल्म मेकिंग विभाग, किर्लोस्कर ऑईल इंजिन लिमीटेड आणी लक्ष्मी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी विद्यापीठात स्पार्क फिल्म फेस्टिव्हलचे आयोजन केले आहे. हा फेस्टिव्हल २ व ३ जानेवारी दरम्यान होणार आहे. या फेस्टिव्हलसाठी २५ डिसेंबरपर्यंत लघुपट व माहितीपट जमा करावयाची आहे. यातील प्रथम क्रमांकास १५ हजार रूपये, व्दितीय क्रमांकास १० हजार तर तृतीय क्रमांकास ७ हजार रूपये बक्षिस दिले जाणार आहे.

10 DEC 2025

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाच्या ८४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर, नोव्हेंबर २०२५ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर परीक्षेतील मंगळवारी १९ अभ्यासक्रमांचे निकाल जाहिर करण्यात आले असून आजअखेर ८४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहिर करण्यात आले आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी परीक्षा ३ नोव्हेंबर पासून सुरु झाल्या आहेत. मंगळवारी ५६ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने १८६ परीक्षा केंद्रावर पार पडल्या असून सदर परीक्षांसाठी ५३ हजार २६३ विद्यार्थी उपस्थित होते. या परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. मंगळवारी सदर पथकाकडून कोल्हापूर १ आणि सातारा २ अशा एकूण ३ गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आली. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले आहे.

10 DEC 2025
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाकडून आजअखेर ८४ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील आजअखेर ८४ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत. विद्यापीठ कार्यक्षेत्रात पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू झाल्या आहेत. मंगळवारी बीए, बी.व्होक., बीडीएफसी, पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, एमआरएस, बॅचलर ऑफ स्पेशल एज्युकेशन, बी.टेक, बॅचलर ऑफ फार्मसी आदी ५६ अभ्यासक्रमांच्या परीक्षा १८६ केंद्रांवर झाल्या. परीक्षेला ५३ हजार २६३ विद्यार्थी उपस्थित होते. दि.९ रोजी बीआयडी, सर्टिफिकेट कोर्स इन डॉक्युमेंट्री फोटोग्राफी, बीए फिल्म मेकिंग, बीबीए, बीए आदी १९ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी नेमलेल्या भरारी पथकाकडून कोल्हापूर (१), सातारा (२) अशा एकूण तीन गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद झाल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.